सन १८७९ मध्ये प्रसिद्ध झालेले श्रीस्वामीसमर्थ महाराजांचे पहिले ‘गद्य’ चरित्र

॥ श्रीस्वामीकृपा ॥

प्रस्तुत

कै. रा. रा. नारायण हरि भागवत लिखित

# श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र

संपादन, संशोधन : विवेक दिगंबर वैद्य

पुनर्वसु प्रकाशन

www.swamikrupa.org

# कृतज्ञतापूर्वक अर्पण



## कै.रा.रा. नारायण हरि भागवत

साक्षात परब्रह्म श्रीस्वामीसमर्थ महाराजांचे अलौकीक, अद्‌भुत आणि अवर्णनीय असे 'सगुण' रूप, श्रीस्वामीसमर्थ संप्रदायाला पहिल्याप्रथम जाणवले, ते केवळ आपल्या लेखणीमुळेच ...

## कै.रा.रा. नारायण रामचंद्र सोहनी

आपल्या 'जगदीश्वर' छापखान्याचे वतीने प्रकाशित झालेल्या 'कै.रा.रा. नारायण हरि भागवत' लिखित 'श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र' या ग्रंथामुळेच आम्ही हे अलौकिक 'श्रीस्वामीसंचित' समस्त श्रीस्वामीभक्त आणि श्रीस्वामीसमर्थ संप्रदायापर्यंत पोहोचवू शकलो ...

**विवेक दिगंबर वैद्य** (संपादक : श्रीस्वामीकृपा)

**सई विवेक वैद्य** (पुनर्वसु प्रकाशन) । **अदिती विवेक वैद्य** (श्रीस्वामीकृपा ग्रंथ सेवा)


श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र.

( भाग १ व २ )

आवृत्ति दुसरी.

प्रकाशक.

नारायण रामचंद्र सोहनी

यांनी

किंमत १२ आणे.

**श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र : नव्या, ‘सुधारीत’** आणि **‘विस्तारीत’ आवृत्तीच्या निमित्ताने ...**

अक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थ महाराजांचे **पहिले** (आद्य) **‘गद्य’ चरित्रकार** म्हणून **कै.रा.रा. श्री.नारायण हरि भागवत’** यांना श्रीस्वामीसमर्थ परिवारामध्ये अतिशय **‘मानाचे स्थान’** दिले गेले पाहिजे. याचे कारण, श्रीस्वामीसमर्थ महाराज समाधिस्थ झाल्यानंतर अवघ्या पाचच महिन्यांनी अर्थात भाद्रपद सन १८७८ मध्ये श्रीस्वामीसमर्थ महाराजांनी एका स्वप्नदृष्टांताद्वारे ‘त्यांचे चरित्रलेखन करण्याची सूचना’ श्री.नारायण हरि भागवत यांना केली होती. खरे पाहता, श्री.भागवत हे काही श्रीस्वामीसमर्थ महाराजांचे भक्त नव्हते. त्यांच्या गाठीशी श्रीस्वामीसमर्थ महाराजांविषयीची फारशी माहिती देखील नव्हती. नोकरीपेशा सांभाळून नाट्यलेखनाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत जनजागृती करण्याचे सरळमार्गी आयुष्य जगत असताना एकाएकी एकेरात्री त्यांना श्रीस्वामीसमर्थ महाराजांचा दृष्टांत झाला आणि ज्या सत्पुरुषाला कधी पाहिले नाही, ज्या सत्पुरुषाचे सांन्निध्य–सहवास कधी लाभले नाही अशा त्या जगद्वंद्य माहात्म्याचे चरित्रलेखन करण्याचे म्हटले तर सकृतदर्शनी अवघड असेच कार्य नारायणरावांच्या माथी आले. त्यामुळे नारायणराव थोडे चिंतीत झाले असले तरीदेखील श्रीस्वामीसमर्थांच्या अतर्क्य लीलांचा अनुभव त्यांना काही दिवसांतच येता झाला आणि या कुतहूलातूनच त्यांनी श्रीस्वामीचरित्र लिहिण्याचा संकल्प केला.

पुढे मात्र नारायणरावांनी अक्कलकोट येथे जाऊन, अनेक तत्कालीन स्वामीभक्तांची भेट घेत, त्यांच्याशी बोलून तसेच बाहेरगावच्या काही भक्तमंडळींकरवी पत्राद्वारे माहिती गोळा करून सन १८७९ मध्ये, **'श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र'** लिहून प्रसिद्ध केले आणि या चरित्रानेच त्यांना श्रीस्वामीसमर्थ महाराजांचे **'आद्य गद्य चरित्रकार'** असा सन्मान लाभला. वास्तविक पाहता, नारायणरावांनी लिहिलेले हे चरित्र पहिल्या प्रथम दोन भागात, छोटेखानी स्वरुपात **'स्वामी चरित्र'** या नावाने नॅशनल प्रेस, मुंबई यांच्याकडून प्रकाशित झाले. मात्र, दुसऱ्या आवृत्तीच्या वेळी पूर्वीचे दोन्ही भाग एकत्रित करुन हे चरित्र **'श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र'** या नावाने जगदीश्वर छापखाना, मुंबई यांच्या द्वारे सन १९०६ मध्ये प्रसिद्ध झाले.

वास्तविक पाहता, **'श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र'**कार नारायण हरि भागवत यांचा पिंड अध्यात्माला पूरक होता. त्यांचा जन्म **१९ सप्टेंबर १८४९** मध्ये मुरबाड (संगमेश्वर तालुका, रत्नागिरी) येथे झाला. घरच्या बेतासबात परिस्थितीमुळे शिक्षण व नोकरीसाठी त्यांना पुणे आणि मुंबई आदी शहरात वास्तव्य करावे लागले. तो अवघा काळ स्वातंत्र्य चळवळीचा होता. त्यात स्वातंत्र्यासोबत वैचारीक स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी मंडळी अवतीभवती होती. चिपळूणकर, कानिटकर आदी तर्कशुद्ध बुद्धीवादी विचारवंतांचा पगडा असल्याने तसेच कथेकरी पिंड असल्याने नारायणरावांनी व्याख्याने, वृत्तपत्रीय लेखन तसेच फार्स, नाटके, निबंध आदींच्या माध्यमातून अनेकविध सामाजिक विषय मोठ्या खुबीने हाताळले.

नारायणराव अंधश्रद्धा आणि खुळचट धर्मकल्पना यांच्या विरोधात होतेच शिवाय समाजातील वैचारिक दारिद्र्य आणि नवसुधारकांचा वेडगळ समाजवाद त्यांना रुचत नसे. 'हिंदुस्थानात दारिद्र्य वाढले आहे ते ओळखण्याची चिन्हे व ते नाहिसे करण्याकरिता मुख्यत्वे करून काय केले पाहिजे या गोष्टीचा सामान्य विचार' हे ज्ञानोत्तेजक सभेमधील व्याख्यान (सन १८७४) तसेच 'स्त्रिया साहसी व दुराचारी होण्यास बालविवाह कारण आहे काय?' हे एशियाटिक, मुंबई येथील त्यांचे व्याख्यान (सन १८७७) अतिशय गाजले. याच दरम्यान, धंद्याची विल्हेवारी, सद्यस्थितीचा रंग असे विविध वैचारिक लेख आणि व्याख्यानांद्वारे सामाजिक अपप्रवृत्तींना वाचा फोडणाऱ्या नारायणरावांच्या लेखणीला तिरकस शब्दांची नाट्यमय साथ लाभली व त्यातूनच जनप्रबोधन करणारी अनेक प्रहसने निर्माण झाली. उपरोध आणि बोचऱ्या विनोदाद्वारे सामाजिक व्यंगावर प्रहार करणारे 'प्रहसनकार' म्हणून नारायण हरि भागवत यांचा नाट्यवर्तुळात दबदबा निर्माण झाला. फर्डा मुत्सद्दी, फॅशनेबल वाईफ अथवा विचार संन्निपात, राष्ट्रीय विचार, स्त्रीविद्या वैचित्र्यदर्शन, हुंडा, भोर एल. एल. बी. आदी प्रहसने सोबतच, उच्च शिक्षणाचे विपरित परिणाम दर्शविणारे 'भार्याप्रमाद' अथवा 'पती विटंबना' हे नाटक तत्कालीन आशयप्रधान नाटकांमध्ये वेगळीच उंची गाठणारे ठरले.

नारायण हरि भागवत यांच्या घरातील पिढीजात वातावरण धार्मिक व त्या काळातील परंपरेला साजेसे असले तरीही नारायणरावांना अंधश्रद्धा, भाबडेपणा, दैववादी वृत्ती, बुवाबाजी यांविषयी विलक्षण तिटकारा होता. आयुष्याच्या पूर्वार्धाची म्हणजे जवळपास तीस वर्षे तर्कशुद्ध विचारसरणीने व्यापली असताना, सन १८७८ मध्ये त्यांना श्रीस्वामीसमर्थ महाराजांनी स्वप्नदृष्टांताद्वारे, 'आमचे चरित्र लिहावे' असे सांगितले. याआधी ऑनरेबल नारायण वासुदेव दाभोळकर यांचे चरित्र (सन १८७४) लिहिण्याखेरीज अन्य कोणतेही चरित्रात्मक लेखन करण्याचा अनुभव नारायणरावांच्या गाठीशी नसल्याने, मात्र श्रीस्वामीसमर्थांच्या कृपेची प्रचिती व प्रत्यंतर आल्यामुळे नारायणराव श्रीस्वामी महाराजांकडे आकर्षित झाले. आणि पुढे, अनेक स्वामीभक्तांच्या गाठीभेटी व प्रत्यक्ष स्थलदर्शन करून त्यांनी श्रीस्वामींचे उत्तम चरित्र लिहिले.

श्रीस्वामीसमर्थांचे चरित्र लिहिल्यानंतर मात्र नारायणरावांच्या विचारांमध्ये बराच बदल झाला. अध्यात्म विषयीचा त्यांचा ओढा व व्यासंग वाढला. याच कालावधीत नारायणरावांनी श्रीमुकुंदराज विरचित **'सार्थ परमामृत'** ग्रंथाचे मूळ, गद्य मराठी भाषांतर करण्याचे कार्य हाती घेतले. या ग्रंथाला मान्यवरांचा पुरस्कार लाभला शिवाय दोन दशकांमध्ये या ग्रंथाच्या पाच आवृत्त्या प्रकाशित झाल्या. नारायणरावांचे आध्यात्मिक लेखन तसेच त्यांच्या सामाजिक जाणिवा प्रकट करणारी सर्व प्रहसने व नाटके १८८०-९० या एकाच कालखंडात पुस्तकरुपाने प्रसिद्ध झाली. याच दरम्यान, नारायणरावांचा परिचय गोविंद नारायण सोहोनी (जगदीश्वर छापखाना, मुंबई) यांच्याशी झाला. सोहोनी यांच्या आग्रहाखातर श्रीज्ञानेश्वरांचे चरित्र लिहित असतांनाच नारायणरावांना 'ज्ञानेश्वरी'ने भुरळ घातली. 'ज्ञानेश्वरी'च्या अभ्यासाने त्यांच्या वृत्तीचा पालट केला. यातूनच त्यांनी **'गीता-ज्ञानेश्वरी रहस्य'** (सन १८९६) या अभ्यासपूर्ण ग्रंथाचे लेखन केले. मात्र, पुढे त्यांचे अल्पकाळाचे आयुष्य सरले आणि **०४ एप्रिल १९०१** मध्ये त्यांचे निधन झाले.

नारायण हरि भागवत यांचे हे लौकिक चरित्र येथे थोडक्यात मांडले असले तरीदेखील त्यांचा समग्र जीवन प्रवास आणि त्यांची प्रदीर्घ नाट्यकारकीर्द याविषयी करवीर कोल्हापूर येथे वास्तव्यास असलेल्या **प्राचार्य श्री.शिवाजी विठ्ठल सुतार** यांनी केलेले लेखन याच ग्रंथाच्या परिशिष्ट विभागात दिलेले आहे. **प्रा. श्री.शिवाजी सुतार** यांनी **'नारायण हरी भागवत यांच्या नाट्यलेखनाचा अभ्यास'** या विषयावर विशेष अभ्यासात्मक प्रबंध लिहिलेला आहे. **२०२३-२४** हे वर्ष **कै. नारायण हरि भागवत यांच्या जन्मजयंतीचे १७५वे वर्ष** असल्याकारणाने आम्ही त्यांची समग्र माहिती श्रीस्वामीसमर्थ संप्रदायातील वाचकभक्तांपर्यंत नेण्याचे योजिले आहे. आमच्या या प्रयत्नांना **प्रा. श्री.शिवाजी सुतार** यांनी उत्तम प्रकारे सहकार्य करुन **कै. नारायण हरि भागवत** यांचे **समग्र चरित्र** उपलब्ध करुन दिले त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार.

नित्यनेमाप्रमाणे, आमच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहणाऱ्या **श्रद्धेय श्रीमती सुबोधिनीताई रांगणेकर** यांना ग्रंथाचा विषय समजताच त्यांनी तत्परतेने **कै. नारायण हरि भागवत** लिखित **'श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र'** या ग्रंथाविषयी **'थिऑसॉफिल सोसायटी'**तर्फे प्रकाशित होणाऱ्या **'थिऑसॉफिस्ट'** या मासिकाच्या **जानेवारी १८८०** मधील **कै.दामोदरराव मावळणकर** यांनी इंग्रजीमध्ये लिहिलेला समिक्षात्मक लेख 'The Swami Of Akkalkot' पाठवला. **श्रद्धेय सुबोधिनीताईंचे** वडील **कै.गणपतराव नाईक** यांनी **'थिऑसॉफिल सोसायटी'**कडून मिळविलेली मूळ लेखाची प्रत मोठ्या आत्मियतेने सुपूर्द केली. त्यामुळे या लेखाविषयीचा भरभक्कम पुरावा हाती लागू शकला. सध्याच्या अनैतिहासिक व अनैसर्गिक वातावरणात प्रत्येक गोष्टीला पुरावा देण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. अन्यथा, केवळ पूर्वपुण्याईच्या जोरावर संशोधक या नात्याने 'अंध'भक्तप्रियता लाभलेली काही मंडळी स्वतःच्या सोयीनुसार तसेच अल्पबुद्धीच्या भांडवलावर 'साक्षात' सद्‌गुरुंनाही 'लाज' व 'कमीपणा' आणण्यास मागेपुढे पाहात नाहीत. असो. ग्रंथासाठी तनमनधनादी मार्गाने मदत व साहाय्य करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानतो.

वयाच्या अवघ्या बावन्नाव्या वर्षी लौकिक आयुष्यातील अखेरचा श्वास घेणारे नारायण हरि भागवत, हे श्रीस्वामीसमर्थ महाराजांच्या आदेशानुसार, त्यांच्या चरित्रलेखनाच्या रुपाने अलौकिक व अद्‌भुत कार्य करते झाले व श्रीस्वामीसमर्थ संप्रदायामध्ये **'पहिले गद्य चरित्रकार'** म्हणून **'अजरामर'** झाले. त्यामुळेच,

**हे ग्रंथसंचित, कै. नारायण हरि भागवत यांच्या पवित्र स्मृतीस विनम्रभावे अर्पण करीत आहे.**

विवेक दिगंबर वैद्य (संपर्क : ९३२४४६८१५८)

# अनुक्रमणिका

## कै. रा. रा. नारायण हरि भागवत लिखित
# श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र


०५ **श्रीअक्कलकोटस्थ स्वामी चरित्र**
संपादकीय : **विवेक दिगंबर वैद्य**

१० **श्रीअक्कलकोटस्थ स्वामी चरित्र**
प्रस्तावना : **शंकर नारायण भागवत**

११ **श्रीअक्कलकोटस्थ स्वामी चरित्र**
उपोद्घात : **नारायण हरि भागवत**

२१ **श्रीअक्कलकोटस्थ स्वामी चरित्र**
भाग पहिला : **पूर्वपीठिका : नारायण हरि भागवत**

५५ **श्रीअक्कलकोटस्थ स्वामी चरित्र**
भाग दुसरा : **अद्भुत चमत्कार : नारायण हरि भागवत**

१०३ **लेखक कै. नारायण हरि भागवत यांचे जीवन चरित्र**
चरित्र लेखन : **प्रा. शिवाजी विठ्ठल सुतार**

१११ **The Swami Of Akkalkot**
मूळ इंग्रजी समिक्षापर लेखन : **कै. दामोदर मावळणकर**

११८ **अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ**
मराठी भावानुवाद : **सुनिता काळुसकर**

## ‘श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र’ : या ग्रंथाचा प्रवास आणि वैशिष्ट्ये

सन १८७९ मध्ये प्रकाशित झालेले **कै. नारायण हरि भागवत** लिखित **‘श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र’** हे अक्कलकोटनिवासी श्रीस्वामीसमर्थ महाराज यांचे **‘सर्वप्रथम’ लिहिलेले** व **प्रसिद्ध झालेले ‘गद्य’** चरित्र आहे आणि, म्हणूनच हा चरित्र-ग्रंथ **‘श्रीस्वामीसमर्थ संप्रदायासाठी विशेष महत्त्वाचा’ आहे.**

श्रीस्वामीसमर्थ महाराजांचे हे छोटेखानी चरित्र सर्वप्रथम **नॅशनल प्रेस, मुंबई** द्वारे प्रकाशित करण्यात आले. तेव्हा, हे चरित्र एकाचवेळी **‘दोन’** भागात प्रसिद्ध झाले होते. पहिल्या भागाची पृष्ठसंख्या **४८** होती व दुसऱ्या भागाची पृष्ठसंख्या **५६** होती. या दोन्हीही भागांची किंमत त्याकाळी **प्रत्येकी आठ आणे** इतकी होती.

**‘श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र’** या ग्रंथाची **दुसरी आवृत्ती** सत्तावीस वर्षांनी म्हणजेच, **सन १९०६** मध्ये प्रकाशित झाली. ही **सुधारीत आवृत्ती** प्रकाशक **नारायण रामचंद्र सोहनी** यांनी त्यांच्या **‘जगदीश्वर छापखाना’** या प्रकाशन संस्थेद्वारे प्रसिद्ध केली. ही आवृत्ती पहिल्या व मूळ आवृत्तीप्रमाणे दोन भागांत न छापता एकत्रितरित्या छापण्यात आली. दुसऱ्या आवृत्तीची पृष्ठसंख्या **१६०** असून किंमत अवघी **बारा आणे** इतकी होती. **दुर्दैवाने ही आवृत्ती पाहावयास नारायण हरि भागवत मात्र हयात नव्हते.**

त्यानंतर, तब्बल **१०६** वर्षांनी म्हणजेच **सन २०१२** मध्ये **‘श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र’** ग्रंथाची सुधारीत आवृत्ती **‘पुनर्वसु प्रकाशन, मुंबई’** यांच्याद्वारे प्रसिद्ध झाली आणि आजपावेतो **‘मूळ’** व **‘डिलक्स’** या **‘दोन’** स्वरुपात तसेच ‘इंग्रजी’ भाषेमध्ये देखील **‘श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र’** प्रसिद्ध करण्यात आले आहे.

## श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र : दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना (सन १९०६)

सदर स्वामी चरित्राची पहिली आवृत्ती सन १८७९ त छापली होती व त्यावेळी याचे दोन निराळे भाग छापले होते. पहिल्या आवृत्तीच्या प्रती संपूनही सुमारे बारा चौदा वर्षे झाली. त्याच वेळी याची दुसरी आवृत्ती निघावयाची परंतु तसा योग (त्यावेळी) आला नाही. तो योग यंदा एकाएकी श्रीस्वामी महाराजांचे कृपेने जमून आला. ही आवृत्तीही विशेष फरक न करता जशीचे तशीच छापली आहे. जेथे कालासंबंधाने उल्लेख आलेला आहे तेथे तो काल सन १८७९ चे पूर्वीचा अगर त्या वेळचा जसा असेल तसा समजावा. पूर्वी दोन भागांची किंमत एक रुपया होती. तीही प्रस्तुतचे प्रकाशक यांनी कमी करून फक्त बारा आणे ठेवली आहे. करिता ह्या (त्यांचे) सवलतीची, श्रीस्वामी महाराजांची भक्तमंडळी व इतरही भाविक फायदा करून घेतील अशी आशा आहे आणि या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकाने आपले स्वाधीन ठेविले आहे.

**कै. शंकर नारायण भागवत**

(स्वामीचरित्रकार कै.रा.रा. नारायण हरि भागवत यांचे सुपुत्र)

**सन १८७९ मध्ये प्रसिद्ध झालेले श्रीस्वामीसमर्थ महाराजांचे पहिले ‘गद्य’ चरित्र**

**कै. रा. रा. नारायण हरि भागवत लिखित**

# श्रीअक्कलकोटस्थ स्वामी चरित्र

## उपोद्घात.

ईश्वराचे इच्छामात्रेंकरून सृष्टि निर्माण झाली आणि तिजमध्यें माया देवीस कुलअखत्यार मिळून नाना तऱ्हेचे खेळ करण्यास त्याची आज्ञा झाली. माया देवी अधिकारवाल्यानें प्रत्यक्ष ईश्वराची कन्या असून जगत्सूत्र हें तिच्या हातीं येऊन राहिलें. त्यामुळें ती सृष्ट जगाची कार्यापुरती अधिकार परत्वें स्वामीण झाली. माया देवीचा अम्मल जमिनीच्या पृष्ठभागावर चालत नाहीं असें एकहि स्थळ सांपडणें दुर्मिळ. जगाची स्वामीण माया आहे आणि ती सर्वाकार, निराकार व निर्विकार परमेश्वराची शक्तिरूप कन्या सर्वाधिकारसंपन्न व निराकारत्वानें सर्वत्र व्यापली आहे ह्मणून जगाचे कारभार सुरळितपणें चालून त्यांत नेहमीं मोठमोठाल्या घडामोडी होत असतात. मायेनें मोह उत्पन्न होतो आणि मोहाचें इच्छारूप देहावर जाळें पसरतें, आणि त्या जाळ्या[illegible]रानें देहेंद्रियें ज्ञानशून्य होऊन नेत्र असतां अंध होतात व कर्ण असतां बधिर होतात. अशा मोहपटलेंकरून अंध व बधिर झालेल्या देहांत माया देवीचें पूर्ण तेज प्रकट होतें. त्या तेजेंकरून एकवार देह भुलला अशी माया देवीची खात्री होण्याबरोबर ती आपलें तेज काढून घेते आणि त्या देहास सोडून देते. मायारूप देहांतून नाहींसें होण्याबरोबर देह भिका पडून जातो, आणि मोहजाळ्याचा

**सन १९०६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र’ या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीत प्रसिद्ध झालेले हे ‘उपोद्घात’ प्रकरणाचे पृष्ठ**

# स्वामी चरित्र.

लोकांनी होती तितकी पराकाष्ठा केली, परंतु या अक्कलकोटस्थ सत्पुरुषाच्या एका केसाचाही बरोबर रीतीनें शोध लागला नाहीं. मग या पुरुषाचें जन्मस्थान कोणतें, यांनी कोणत्या बेचाळीस कुळांचा उद्धार केला, हे कोणत्या दिशेकडून आले, यांनी कडकडीत विरक्तता कां धारण केली, यांचें नांव काय, गोत्र कोणतें, जात कोणती, वगैरे गोष्टींचा शोध कशानें लागणार? साधारणपणें ते ब्राह्मण असावेत इतकें मात्र अनुमान करतां येईल. परंतु कोणत्या शाखेंतील याची कल्पना देखील करतां येत नाहीं. सर्व शाखेंतील ब्राह्मणांस चतुर्थाश्रम स्वीकारण्याचा अधिकार आहे. हे महाराज कधीं कधीं लंगोटा लावीत. भपकेदार करवतीकांठी व जरीकांठी भगवी छाटी अंगावर घेत. कधीं कधीं मोठ्या थाटानें शेलेहि पांघरत. या कारणांनीं त्यांना स्वामी म्हणत. कधीं कधीं दिगंबरीहि फिरत. अन्नव्यवहार इच्छेस वाटेल त्या ठिकाणीं जातीचा किंतु मनांत न बाळगतां करीत. कोणास चमत्कार दाखवूं लागल्यास आकाशमार्गानें समाजांत उतरून वेदघोष सपाट्यानें सुरू करून उन्मत्त ब्रह्मवृंदास धारून टाकीत. अशा कारणांवरून स्वामीमहाराज असें त्यांचें नांव पडलें. स्वामी महाराजांच्या नांवगांवाचा जो पत्ता लागतो, तो लोकांनीं दिलेल्याचा लागतो. परंतु त्यांच्या पाळण्यांतील नांवाचा, व त्यांच्या आईबापांनीं ठेवलेल्या नांवाचा

**सन १९०६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘श्रीअक्कलकोटस्थ स्वामीचरित्र’ या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीमधील पहिल्या भागाचे ‘मूळ’ प्रारंभिक पृष्ठ.**